# २ ते ५९ महिने वयोगटातील अर्भकांमधील तीव्र स्वरुपाच्या न्यूमोनियाची आरोग्य केंद्रातील (रुग्णालयात दाखल) उपाययोजना

**तीव्र स्वरुपाचा न्यूमोनिया म्हणजे बालकाला खोकला किंवा श्वासोच्छवास करताना त्रास होण्याच्या जोडीला खालीलपैकी किमान एक लक्षण दिसून येते:**

- सेंट्रल सायनोसिस किंवा ऑक्सिजन सॅच्युरेशन ९० टक्क्यांपेक्षा कमी.
- श्वसनसंस्थेची तीव्र स्वरुपाचा दाह (श्वासोच्छवास करताना त्रास होणे किंवा वेगाने होणे {श्वासोच्छवासाचा वेग मिनिटाला ७० पेक्षा जास्त} किंवा छातीचा खालचा भाग वेगाने आत ओढला जाणे किंवा मान डुगडुगणे किंवा स्ट्रायडोर किंवा घरघर नाद).
- सामान्य धोकादायक लक्षणांसह न्यूमोनियाची लक्षणे (मातेचे दूध गिळता न येणे किंवा गिळता न येणे, सुस्ती येणे किंवा अर्धवट शुद्धीत असणे किंवा आकडी येणे).

| प्रतिजैविके | प्रत्येकी मात्रा | वारंवारता | पद्धती | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १अ. अँपिसिलीनचे इंजेक्शन किंवा | ५० मि.ग्रॅ./कि.ग्रॅ. | दर ६ तासांनी | शिरेतून, स्नायूवाटे | ७ ते १० दिवस |
| १ब. बेंझिल पेनिसिलीनचे इंजेक्शन | ५०००० युनिट्स / कि.ग्रॅ. | दर ६ तासांनी | शिरेतून, स्नायूवाटे | ७ ते १० दिवस |
| २. जेंटामायसिनचे अतिरिक्त इंजेक्शन | ७.५ मि.ग्रॅ./कि.ग्रॅ. | दिवसातून एकदा | शिरेतून, स्नायूवाटे | ७ ते १० दिवस |

- जर स्टॅफिलोकोक्कल संसर्ग (त्वचेवर फोड/गळू येणे) झाल्याचा संशय असेल तर क्लोक्सासिलीन किंवा ॲम्पिसिलीन व क्लॅव्हयुलॅनेट ॲसिड द्यावे.
- जर सेप्टिक शॉक असेल तर व्हँकोमायसिनसह सेफ्ट्रिएक्झॉन द्या.

## ऑक्सिजन थेरेपी

- ऑक्सिजन सॅच्युरेशन ९० टक्क्यांपेक्षा कमी असलेल्या (९४ टक्क्यांपेक्षा कमी परंतु शॉकसारखी इतर आपत्कालीन लक्षणे असलेल्या) सर्व बालकांना ऑक्सिजन द्या.
- ऑक्सिजनचा पुरवठा करण्यासाठी नासिकेच्या प्राँग्जना प्राधान्य द्या. जर ते उपलब्ध नसतील तर नेझल किंवा नेसोफेरिंजिअल कॅथेटर वापरता येऊ शकते.
- ऑक्सिजन थेरेपीच्या हाताळणीसाठी पल्स ऑक्सिमीटरचा वापर करावा. (ऑक्सिजन सॅच्युरेशन ९० टक्क्यांपेक्षा अधिक ठेवा).

## पूरक सेवा

- जर बालक मुखावाटे सेवन करू शकत नसेल तर त्याला शिरेतून द्रवपदार्थ द्या. जेव्हा बालक मुखावाटे पदार्थांचे सेवन समाधानकारकरित्या करू लागेल तेव्हा त्याला शिरेतून द्रवपदार्थ देण्याचे हळूहळू थांबवा.
- जर बालकाला ताप आला असेल (३८° से.पेक्षा अधिक तापमान) तर पॅरासिटमॉल द्या.
- जर घरघर ऐकू येत असेल तर जलद काम करणारे ब्राँकोडायलेटर द्या.

**जर आरोग्य केंद्रातील उपाययोजना शक्य नसेल तर वरील कोष्टकानुसार पूर्व-संदर्भित मात्रा द्या.**

SAANS साँस
निमोनिया नहीं, तो बचपन सही

Paste in casualty, emergency, SNCUs & paediatric ward.